## प्रेस नोट दिनांक २०/०५/२०१९

## राजस्थान येथे खरेदी करून पुणे येथे वापरत असलेल्या आरटीओ रजिस्ट्रेशन नसलेल्या दोन दुचाकी युनिट १, गुन्हे शाखेने केल्या जप्त

युनिट १, गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी वाहन चोरीचे गुन्हेगारांचा शोध घेण्याचे अनुशंगाने पेट्रोलीग फिरत असताना पो.हवा. ४१६ प्रकाश लोखंडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की पिंपरी पो. स्टे. हद्दित एक इसम बिगर नंबरची काळया रंगाची टीव्हीएस अपॅचि गाडीवरून संशयीत रीत्या फिरत आहे. सदरची बातमी व.पो.निरी. श्री अरुण वायकर यांना कळविली असता त्यांनी योग्य ती कायदेशीर कारवाई करणेचे आदेश दिले.

लागलीच पोलीस उप निरीक्षक उत्तम बुदगुडे यांनी त्यांचे टिमसह सदर इसमास दुचाकीसह ताब्यात घेतले असता प्रथम त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पत्ता अझरुद्दीन अनारदीन साई, वय २० वर्षे ,धंदा पेंटीग, रा. एन सेक्टर, प्रेमपार्क समोर, मासुळकर कॉलनी, अजमेरा, पिंपरी पुणे असे असलेचे सांगीतले. त्याचेकडे दुचाकीबाबत चौकशी केली असता, सदरची गाडी ही राजस्थान येथून सन २०१७ मध्ये खरेदी केलेली होती व सदर गाडीचे आजपावेतो कोठेही आरटीओ रजिस्ट्रेशन केलेले नाही. त्याचेकडे आणखी सखोल चौकशी करता त्याचेजवळ आणखी एक स्कुटी पेप अश्याच प्रकारे असलेचे सांगीतले. सदरच्या दोन्ही दुचाकी काकर मोटर्स, नौखा, बिकानेर, राजस्थान येथून जूलै २०१६-२०१७ मध्ये खरेदी केल्या आहेत.

सदरच्या गाडया एक टीव्हीएस कंपनीची अपॅचि काळया रंगाची कि.रु. ८०,०००/- ची दुचाकी व दुसरी स्कुटी पेप काळया रंगाची कि.रु. ४०,०००/- ची दुचाकी अशी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. सदरच्या दोन्ही दुचाकी पुढील कारवाईकामी रिपोर्टाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशाक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे, पो.हवा. प्रकाश लोखंडे, उमेश काटे, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड यांनी केली आहे.

प्रेसनोट दि. २०/०५/२०१९

**पाहिजे आरोपी - अनिकेत उूर्फ चिक्या हरिश कांबळे. यास युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केले जेरबंद**

-----ooo-----

मा.वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचना व आदेशा प्रमाणे पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सराईत गुंड, गुन्हेगार, फरार व पाहीजे असलेले् गुन्हेगार, तडीपार गुंड, गुन्हेगार यांना वेळोवेळी चेक करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्याबाबत मोहिम उघडलेली असतांना त्याप्रमाणे दिनांक १९/०५/२०१९ रोजी कारवाई करीत असतांना पोशि ७४२८ गायकवाड यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, **लोणी काळभोर पो स्टे पुणे ग्रामीण. गुन्हा रजि ५६२/२०१८ भा.द.वि कलम ३९४, ३२४, ३४१** या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे - अनिकेत उूर्फ चिक्या हरिश कांबळे, वय २१ वर्ष रा. बौध्द वस्ती, लक्ष्मी मंदिरा शेजारी, लोणी काळभोर पुणे.हा पुणे रेल्वे परिसरात फिरत आहे.अशी खात्रीशिर बातमी मिळालेने त्याचा रेल्वे स्टेशन परिसरात शोध घेत असतांना तो रेल्वे स्टेशनचे चारचाकी वहानांचे पार्कीग परीसरात दिनांक १९/०५/२०१९ रोजी १७.३० वा. मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे सदर गुन्हयाबाबत तपास करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.त्यास पुढील कारवाई कामी लोणी काळभोर पो स्टे पुणे ग्रामीण यांचेकडे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री.अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे युनिट-१ विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरुण वायकर, पोलीस उप निरीक्षक दिनेश पाटील, पोलीस कर्मचारी ७४२८ गायकवाड, पो.ना इरफान मोमीन, पोशि २६१४ माळवदकर.यांनी केली आहे.